# पणन संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे

**नवीन मध्यवर्ती इमारत, तिसरा मजला, पुणे-४११ ००१.**

पीबीएक्स-०२०-२६१२६६२८/२६४२६७८५/२६११४०६४

Email-dirmktms@gmail.com


---

जा.क्र.पणन-५/स्थापत्य/ कलम १२ (१)प्रस्ताव/परिपत्रक /२०२०/३८९३ दिनांक :- २६/ ११ /२०२०

प्रति,
मा.कार्यकारी संचालक,
महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ ,पुणे
प्लॉट नंबर आर.७ मार्केट यार्ड ,पुणे -४११ ०३७

विषय:- पणन संचालनालय कार्यालयात कलम १२ (१) अन्वये सादर करावयाचे प्रस्ताव फक्त जिल्हा उपनिबंधक यांचे मार्फत सादर करणे बाबत.

संदर्भ:- या कार्यालयाचे जा.क्र.३७८७/२०२०दिनांक १२/११/२०२० चे परिपत्रक

आपले लक्ष संदर्भिय विषयाकडे वेधण्यात येते.

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये विविध विकास कामे केली जातात . ज्यामध्ये प्रामुख्याने बाजार समितीसाठी जागा खरेदी करणे, जागेची विक्री करणे बांधकाम करणे , फर्निचर खरेदी, मालमत्ता भाडेपटयाने देणे, विदयुतीकरण करणे इत्यादींचा समावेश होतो. सदरचे प्रस्तावास मंजूरी बाबतच्या मर्यादेचे अधिकार शासनाच्या सहकार , पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक १५/११/२०१८ रोजीच्या अधिसुचनेने खालील प्रमाणे प्रदान करण्यात आलेले आहे .

| अ.क्र (१) | पदनाम (२) | प्रदान करण्यात आलेले अधिकार (३) |
|---|---|---|
| १ | पणन संचालक | रु.५० लाखाचे वरील स्थावर व रु.१० लाखावरील जंगम मालमत्तेचे कलम १२ (१) चे अधिकार |
| २ | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था | रु.२५ लाखावरील ते रु.५० लाख पर्यंतचे स्थावर व रु.५ लाखावरील ते रु.१० लाखापर्यंतचे जंगम मालमत्तेचे कलम १२ (१) चे अधिकार |
| ३ | जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था | रु.१० लाखावरील ते रु.२५ लाख पर्यंतचे स्थावर व रु.१ लाखावरील ते रु.५ लाखापर्यंतचे जंगम मालमत्तेचे कलम १२ (१) चे अधिकार |
| ४ | उप/ सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था | रु.१० लाख पर्यंतचे स्थावर व रु.१ लाखपर्यंतचे जंगम मालमत्तेचे कलम १२ (१) चे अधिकार |

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १२ (१) अन्वये मान्यतेसाठीचे ज्या प्रस्तावास पणन संचालकांची मंजूरी आवश्यक आहे ते प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयाकडून थेट पणन संचालनालयात न पाठविता विभागीय सहनिबंधक कार्यालयामार्फत सादर करण्यात येतात, त्यामुळे बराच कालावधी जातो व प्रस्तावावर कार्यवाही होण्यास विलंब होतो. हे निदर्शनास आल्यावर या कार्यालयाने संदर्भिय परिपत्रकाने ( सोबत जोडले आहे )सर्व बाजार समित्या, विभागीय सहनिबंधक व जिल्हा उपनिबंधक कार्यालयांना कळविण्यात आले आहे की, कलम १२(१) अन्वये मंजूरी साठीचे प्रस्ताव शासनाच्या दिनांक १५/११/२०१८ रोजीच्या अधिसुचनेनुसार तालुका सहाय्यक उपनिबंधक , जिल्हा उपनिबंधक, सहनिबंधक सहकारी संस्था यांनी त्यांच्या मर्यादेतील प्रस्तावावर कार्यवाही त्यांचे स्तरावर करावी व पणन संचालनालयाच्या कक्षेतील प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक यांनी विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयास न पाठविता थेट पणन संचालनालयास पाठवावेत. त्यामुळे संदर्भिय परिपत्रकानुसार तालुका सहाय्यक / उपनिबंधक ,जिल्हा उपनिबंधक ,विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयाचे स्तरावर महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १२ (१) अन्वये मंजूरी बाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही होणे करीता महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडून विकसित करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीमध्ये त्याप्रमाणे आवश्यक ते बदल करणे आवश्यक आहे. तरी त्या बाबत संबंधितांना आवश्यक त्या सुचना देण्यात याव्यात .

( सतिश सोनी )
पणन संचालक
महाराष्ट्र राज्य ,पुणे